**CNR No :- MHSI100000662024**

## –: नियमीत दिवाणी मुकदमा क्र. १४/२०२४ :–

## –: निशाणी ११ वरील आदेश :–

वादी क्र. २ ने प्रस्तुतचा अर्ज मुळ मुळ दाव्यात दुरुस्ती होऊन मिळणेसाठी केला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, या कामातील प्रतिवादी नं. ६, ८, ९, १०, १२ व १४ यांना सदर दाव्याचे समन्स मे. कोर्टामार्फत पाठविले असता प्रतिवादी नं. ६ व ९, प्रतिवादी नं. ८ व १२ आणि प्रतिवादी नं. १० व १४ हया एकच व्यक्ती असल्याच्या शेराने समन्स न बजाविता परत आलेले आहे व सदरची बाब बेलीफ रिपोर्टमध्ये नमूद करण्यात आलेली आहे. तरी सदर दाव्यातील प्रतिवादी नं. ६ श्रीमती सुमित्रा सहदेव करमळकर हिच्या नावाच्या खाली (पूर्वाश्रमीची निर्मला नारायण खांबल) तसेच प्रतिवादी नं. ८ श्रीमती आनंदी गोविद गवस हिच्या. नावाच्या खाली (पूर्वाश्रमीची मिनाक्षी नारायण खांबल) व प्रतिवादी नं. १४ श्रीमंती विधुतलता विद्याधर खांबल हिच्या नावाची खाली (पूर्वाश्रमीची पुष्पा नारायण खांबल) असे नमूद करणे आवश्यक व क्रमप्राप्त आहे. तसेच प्रतिवादी नं. ९, १२ व १४ यांच्या नावावर काट मारुन त्यांची नावे दाव्यातून कमी करणे आवश्यक व क्रमप्राप्त आहे. तसेच या दाव्यातील प्रतिवादी नं. १४ हिचे आडनाव गवस असून सदरचा दावा संगणीकृत करताना तिचे आडनाव नजरचूकीने खांबल असे नमूद करण्यात आलेले आहे. तरी प्रतिवादी नं. १४ हिच्या आडनावावर काट मारुन त्याठिकाणी गवस अशी दुरुस्ती करणे

आवश्यक व क्रमप्राप्त आहे. सदरची दुरूस्ती ही औपचारिक (Formal) स्वरूपाची असून ती मंजूर झाल्यास प्रतिवादी यांचेवर कोणताही अन्याय होणारा नाही. उलट प्रस्तुतच्या दाव्याचा न्यायोचित, परिणामकारक व अंतिम निकाल होण्याच्या दृष्टीने त्यामुळे उलट मदतच होणारी आहे. एवढेच नव्हे तर सदरची दुरुस्ती ही मूळ दाव्याचा परिणामकारक व अंतिम निकाल होणेस सहायभूतच ठरणारी आहे. सबब, न्यायपूर्ततेकरीता मूळ दाव्यामध्ये वरीलप्रमाणे दुरूस्ती करण्यास परवानगी मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०३. अर्ज व कागदपत्राचे अवलोकन केले. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०४. वादी क्र. २ च्या म्हणण्यानुसार, सदर दाव्यातील प्रतिवादी नं. ६ श्रीमती सुमित्रा सहदेव करमळकर हिच्या नावाच्या खाली (पूर्वाश्रमीची निर्मला नारायण खांबल) तसेच प्रतिवादी नं. ८ श्रीमती आनंदी गोविद गवस हिच्या नावाच्या खाली (पूर्वाश्रमीची मिनाक्षी नारायण खांबल) व प्रतिवादी नं. १४ श्रीमंती विधुतलता विद्याधर खांबल हिच्या नावाची खाली (पूर्वाश्रमीची पुष्पा नारायण खांबल) असे नमूद करुन प्रतिवादी नं. ९, १२ व १४ यांच्या नावावर काट मारुन त्यांची नावे दाव्यातून कमी करणे तसेच प्रतिवादी नं. १४ हिचे आडनाव खांबल ऐवजी गवस असे नमुद करण्यास परवानगी मिळावी.

०५. अर्जाचे स्वरुप पाहता वादी मागत असलेली दुरुस्ती दाव्याकामी महत्वाची असल्याचे दिसून येते. वादीने अर्जात नमुद केलेले कारण अर्ज मंजुरीकरीता

संयुक्तीक व समाधानकारक नाही. त्यामुळे न्यायालयाचा अमुल्य वेळ व्यर्थ गेलेला आहे. वादी मागत असल्याप्रमाणे दुरुस्ती नाकारणे हे नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन होणारे नाही. तसेच वादी यांचे मोठया प्रमाणात नुकसान देखील होणारे आहे. अर्ज नामंजूर केल्यास अर्जाच्या अनुषंगाने करावी लागणारी विविध कायदेशीर कामे चालविण्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी झालेल्या विलंबाचे खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन करणे मला उचित वाटते. सबब खालीलप्रमाणे पारीत करण्यात येत आहे.

**–:: आदेश ::–**

१. न्यायाचे कारणे रक्कम रु.३००/– (रुपये तीनशे मात्र) खर्चाचे आदेश करुन नि.क्र.११ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने सदर आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत कसुरीशिवाय सदर खर्चाची रक्कम रु.३००/– (रुपये तीनशे मात्र) भरुन; अर्जातील मागणी प्रमाणे मुळ दाव्यात दुरुस्ती केल्यावर तशी दुरुस्त प्रत हजर करावयाची आहे.

३. सदरची खर्चाची रक्कम रु.३००/– (रुपये तीनशे मात्र) मोफत विधीसेवा प्राधिकरण (Free Legal Aid) कडे जमा करणेत यावी.

४. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास सदरचा आदेश स्वयंचलनाने (automatically) रद्द झाला असे समजण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2024.11.13 17:26:48 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – १३.११.२०२४. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) दोडामार्ग.